आता म्हाडा उपलब्ध करणार भाड्याने घरे

सर्वसामान्यांना दिलासा मिळणार

मुंबई, दि. १५ : प्रतिनिधी

मुंबईमध्ये आपले स्वतःचे घर असावे असे प्रत्येकाचे स्वप्न असते, मात्र घरांच्या किंमतींमध्ये मोठी वाढ झाल्याने घर घेणे हे आता सर्वसामान्यांच्या अवाक्या बाहेर गेले आहे. त्यामुळे अनेकजण म्हाडाच्या घरांसाठी अवलंबून असतात किंवा लॉटरीची प्रतिक्षा करत असतात. मात्र आता म्हाडा घरांच्या विक्रीबरोबरच भाडेतत्वावरदेखील घरे देणार आहे. यासाठी नो ब्रोकर, मॅजिकब्रिक्सच्या धर्तीवर म्हाडा लवकरच स्वतःचे पोर्टल लाँच करणार आहे. पोर्टल तयार करण्यासाठी म्हाडाने प्रसिद्ध केलेल्या स्वारस्य निविदेला तब्बल १७ कंपन्यांनी प्रतिसाद दिला आहे.

केंद्र सरकारच्या निती आयोगाच्या निर्देशानुसार, महाराष्ट्र शासनाने म्हाडाला भाडेतत्वावर देण्यात येणाऱ्या घरांचे धोरण (रेंटल पॉलिसी) तयार करण्यासाठी नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती केली आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी स्मार्ट रेंटल हाऊसिंग पोर्टल तयार करण्यात येणार आहे. मुंबई महानगर प्रदेशात भाडेतत्वावर घरे घेता यावीत म्हणून म्हाडाकडून पोर्टल तयार करण्यासाठी लवकरच निविदा काढल्या जाणार आहे. त्यानुसार सध्या स्वारस्य दाखवलेल्या १७ कंपन्यांपैकी ज्यांची निविदा योग्य असेल त्यांना काम दिले जाणार आहे. निवड झालेल्या कंपनीला सहा महिन्यात पोर्टल तयार करून म्हाडाला सुपूर्द करावे लागणार आहे.

म्हाडाच्या या पोर्टलमुळे नागरिकांना घर भाडय़ाने घेण्यासाठी किंवा देण्यासाठी आता दलालांवर विसंबून राहण्याची गरज भासणार नाही. केवळ नाममात्र सर्व्हिस चार्ज भरून नागरिक या सुविधेचा लाभ घेऊ शकणार आहेत. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळणार आहे.भाडेकरू व्यवस्थापन, देखभाल नोंदी, उपलब्ध घरांची माहिती, भाडेकरार, पोलीस व्हेरिफिकेशन, स्टॅम्प डयुटी व नोंदणी या प्रक्रिया एकाच प्लॅटफॉर्मवर उपलब्ध होतील. यामुळे महाराष्ट्रात भाडेतत्त्वावर घर घेणे अधिक सोपे, सुरक्षित आणि परवडणारे होणार आहे. या निर्णयामुळे लवकरच म्हाडाच्या माध्यमातून भाड्याची घरे सहज मिळू शकणार आहेत. मुंबई, ठाणे, नवी मुंबई घर खरेदी करणे खिशाला परवडत नाही. तसेच अनेकदा नोकरदार, विद्यार्थ्यांना घर विकत घेणे शक्य नसल्याने त्यांच्याकडून भाड्याच्या घरांना पसंती दिली जाते, मात्र अनेकदा भाड्याचे घर मिळवणे कठीण असते. तसेच केंद्र सरकारच्या नियोजनानुसार मुंबईसह एमएमआरमध्ये ग्रोथ हब उभारले जाणार आहे.

दोनही ठाकरे एकत्र आल्याचा आम्हाला कुठलाही फटका बसणार नाही- मुख्यमंत्री

मुंबई, दि. १५ : प्रतिनिधी

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांचा कार्यक्रम आज राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला. सर्वाधिक चर्चेत असलेल्या मुंबई महापालिकेसह सर्व महापालिकांच्या निवडणुकांसाठी १५ जानेवारीला मतदान तर १६ जानेवारीला निकाल जाहीर केले जाणार आहेत. यंदाच्या मुंबई पालिका निवडणुकीत राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्रित लढणार आहेत. तसेच, महाविकास आघाडीचे त्यांना पाठबळ मिळू शकेल. याबाबतच्या प्रश्नाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले.

दोन्ही ठाकरे एकत्रित आले तरीही, नाही आले तरीही कुठलाही फटका बसणार नाही. तसेच दोन्ही ठाकरे एकत्र आले आणि काँग्रेसही त्यांच्यासोबत गेली तरीही मुंबईकर आमच्या भाजपा शिवसेना महायुतीलाच निवडून देतील. कारण आमचा कारभार, आम्ही केलेला विकास आणि मराठी माणसाचं जोपासलेलं हित हे सामान्य मुंबईकरांनी पाहिलेलं आहे. त्यामुळे मुंबईकर आमच्या सोबत राहतील," असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

"मतदार याद्यांमध्ये घोळ आहे हे आम्ही देखील दाखवले आहे, पण त्याकरता निवडणुका घ्यायच्या नाहीत असे करता येणार नाही. गेले २०-२५ वर्षे जे लोक निवडणुका लढवत आहेत, त्यांना माहिती आहे कमी अधिक प्रमाणात मतदार यादीमध्ये घोळ असतोच. पण सर्वोच्च न्यायालयाचे आदेश मिळाल्यानंतरही काही ना काही कारण काढून निवडणुका पुढे करा अशी ओरड करणे योग्य नाही. या ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेले प्रतिनिधी असले पाहिजेत. त्यांच्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था असली पाहिजे. म्हणून आमची मागणे आहे की निवडणुका वेळेवरच व्हाव्यात," असे ते म्हणाले.

उद्धवसेनेचे खासदार अनिल देसाई यांचे राज्य निवडणूक आयुक्तांना पत्र

मुंबई, दि. १५ : प्रतिनिधी

महापालिका निवडणुकांची आज घोषणा करण्यात आली आहे. राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका एकाच टप्प्यात घेतल्या जाणार असल्याचं निवडणूक आयोगाने सांगितलं. १५ जानेवारीला मतदान आणि १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे असे राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त वाघमारे यांनी केली. याच दरम्यान अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्याआधीच महापालिका निवडणुकांच्या घोषणेवरून उबाठाने राज्य निवडणूक आयुक्तांना पत्र लिहिले आहे. "एकीकडे मतदार याद्यांची प्रक्रिया पूर्ण झालेली नसताना दुसरीकडे आजच राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेऊन निवडणुका जाहीर केल्या. हा प्रकार केवळ प्रशासकीय बेजबाबदारपणा नसून मतदारांच्या हक्कांची पायमल्ली आणि लोकशाही प्रक्रियेची थट्टा आहे" असे म्हणत निशाणा साधला आहे. उद्धवसेनेचे खासदार अनिल देसाई यांनी हे पत्र लिहिले आहे. "आज राज्य निवडणूक आयोगाने महापालिका निवडणुकांसाठी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्याचे आश्वासन दिलं होतं. मुंबई महानगरपालिकेतर्फे वर्तमानपत्रांत जाहिराती देऊन तसा दावाही करण्यात आला. मात्र ही अंतिम मतदार यादी ना आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, ना त्याची छापील प्रत महानगरपालिकेच्या मुख्यालयात उपलब्ध करून देण्यात आली आहे." "एकीकडे मतदार याद्यांची प्रक्रिया पूर्ण झालेली नसताना दुसरीकडे आजच राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेऊन निवडणुका जाहीर केल्या. हा प्रकार केवळ प्रशासकीय बेजबाबदारपणा नसून मतदारांच्या हक्कांची पायमल्ली आणि लोकशाही प्रक्रियेची थट्टा आहे. याबाबतीत आमचा आयोगाला थेट सवाल आहे की, प्रशासकीय तयारी पूर्ण नसताना निवडणूक घोषणेची एवढी घाई का केली? अशा अपुऱ्या आणि त्रुटीपूर्ण तयारीनिशी निवडणुका जाहीर करणं हे कायदेशीरदृष्ट्या आणि नैतिकदृष्ट्या चुकीचं आहे. यामुळे निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे" असे पत्रात म्हटलं आहे.

झोपडीचा खरेदी व्यवहार केलेल्यांना अभय योजनेअंतर्गत अर्ज करण्यासाठी एक वर्ष मुदतवाढ

मुंबई, दि. १५ : प्रतिनिधी

मुंबईतील रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पात्र झोपडीधारकांकडून झोपडी खरेदी केलेल्या झोपडीधारकांना राज्य सरकारने दिलासा दिला आहे. अशा झोपडीधारकांचे नाव परिशिष्ट-२ दोन समाविष्ट करून झोपडीची हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आखण्यात आलेल्या अभय योजनेला पुन्हा एकदा राज्य सरकारने मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत अर्ज करता येणार आहे. या मुदतीत झोपडी खरेदी करणाऱयांना अर्ज करता येणार असून मुंबईत असे अंदाजे १० हजाराहून अधिक झोपडीधारक असण्याची शक्यता आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून राबविण्यात येणाऱया झोपडरपट्टी पुनर्वसन योजनेसाठी परिशिष्ट-२ मध्ये नोंदणी असलेले झोपडीधारकच पात्र ठरतात. आवश्यक ती सर्व कागदपत्रे सादर करून झोपडीधारकांना पात्रता निश्चित करून घेता येते. झोपडी खरेदी केलेल्या झोपडीधारकांच्या नावे झोपडी होत नाही किंवा झोपडीचे हस्तांतरण होत नाही तेव्हा झोपडीधारकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

अनेक ठिकाणी यामुळे झोपु योजनेला विरोध होतो. विरोधामुळे योजना लांबणीवर पडतात. रखडलेल्या योजना आणखी रखडतात.अशावेळी रखडलेल्या योजना आणि इतर योजना वेगाने मार्गी लागाव्यात आणि झोपडी खरेदी केलेल्या झोपडीधारकांनाही झोपु योजनेचा लाभ मिळावा, त्यांना पुनर्वसित इमारतीत घर मिळावे यासाठी राज्य सरकारने अभय योजना आणत अशा झोपडीधारकांना परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट करुन घेण्याचा निर्णय घेतला. झोपड्यांचे हस्तांतरण करून घेण्याची संधी अशा झोपडीधारकांना दिलासादायक ठरली आहे. या अभय योजनेची मुदत ऑक्टोबर २०२४ मध्ये संपली. मात्र या कालावधी अपेक्षित तेवढे अर्ज न आल्याने योजनेला ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र तरीही याबाबतची माहिती लाभार्थ्यांपर्यंत पोहोचली नाही. हजारो झोपडीधारकांना या योजनेचा लाभ घेता आला नाही. त्यामुळे राज्य सरकारने अभय योजनेला पुन्हा मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतची घोषणा नुकतीच उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत केली.

झोपु योजनेतील अधिकाऱयांनी दिलेल्या माहितीनुसार अभय योजनेअंतर्गत झोपु प्राधिकरणाकडे ३८८७ अर्ज दाखल झाले आहेत. त्यातील २३२८ अर्ज स्वीकारण्यात आले असून ४९३ अर्ज नाकारण्यात आले आहेत. तर १०६६ अर्जांवरील निर्णय प्रक्रिया प्रलंबित आहे. मुदत संपल्यानंतर झोपु प्राधिकरणाकडे अंदाजे ८ हजार अर्ज सादर झाले आहेत. मात्र मुदत संपल्याने झोपु प्राधिकरणास हे ते अर्ज स्विकारता आलेले नाहीत.

अजूनही मोठ्या संख्येने झोपडीधारक अर्ज करू शकलेले नाहीत. अशा झोपडीधारकांची संख्या १० हजारांहून अधिक असण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर झोपडी हस्तांतरणाच्या अभय योजनेला मुदतवाढ देण्याची मागणी होत होती. ही मागणी मान्य करून अभय योजनेला डिसेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. एकनाथ शिंदे यांच्या घोषणेची अंमलबजावणी लवकरच सुरू करून अर्ज सादर करुन घेण्यास सुरूवात केली जाणार आहे. त्यामुळे हजारो झोपडीधारकांना दिलासा मिळणार आहे.

महालक्ष्मी रेसकोर्सवर उभारणार भव्यदिव्य सेंट्रल पार्क - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई, दि. १५ : प्रतिनिधी

मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्स आणि कोस्टल रोडची मोकळी जागा मिळून एकूण २९५ एकरवर जागतिक दर्जाचे सेंट्रल पार्क उभारले जाणार आहे. प्रस्तावित सेंट्रल पार्कचा आराखडा आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर सादर करण्यात आला. यावेळी मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर उपस्थित होते. मुंबईकरांसाठी आजवरचे हे सर्वात मोठे गिफ्ट असून हे या ठिकाणी कोणतंही कॉक्रिटचे होणार नाही. हे सेंट्रल पार्क भूमिगत मार्गाने थेट कोस्टल रोडशी जोडले जाणार आहे. रेसकोर्स आणि त्याच्या ऐतिहासिक वारशाला कुठेही धक्का लागणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिली.

महालक्ष्मी रेसकोर्सवरील १२५ एकरवर जागतिक दर्जाच्या सेंट्रल पार्कची उभारणी होतेय. कोस्टल रोडची १७० एकर जागा असे एकूण २९५ एकरचे भवदिव्य सेंट्रल पार्क तयार केले जाणार आहे. तसेच सेंट्रल पार्कखाली १० लाख चौरस फुटांचे जागतिक दर्जाच्या स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सही विकसित केले जाणार आहे. यात आंतरराष्ट्रीय पातळीवरील खेळांसह खेळ, खो-खो, कबड्डी, अशा मराठमोळ्या खेळांसाठीही सुविधा उपलब्ध होईल. हे स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स पर्यावरण पूरक आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. सेंट्रल पार्कमध्ये फिरताना मुंबईकरांना अश्वशर्यतीही पाहता येतील, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. सेंट्रल पार्कच्या भूपृष्ठावर पदपथ वगळता कोणतेही बांधकाम नाही. हे संपूर्ण उद्यान असेल, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. येथे सुरळीत वाहतूक नियोजनच्या दृष्टीने हे सेंट्रल पार्क १२०० मीटर भूमिगत मार्गाने कोस्टल रोडशी जोडला जाणार आहे. यासाठी ५५० कोटींचे टेंडर काढण्यात आले आहे. या सर्व प्रकल्पांचे डिझाईन हाफिज कॉन्ट्रॅक्टर यांनी केले आहे.

सेंट्रल पार्कच्या कनेक्टिव्हीटीबाबत बोलताना आयुक्त भूषण गगराणी म्हणाले की या पार्कसाठी मेट्रो ३ मार्गावर नेहरु विज्ञान केंद्र हे जवळचे स्टेशन आहेत. या स्टेशनला भूमिगत मार्गाने सेंट्रल पार्कशी जोडले जाईल, हा भूमिगत मार्ग अँनी बेझंट मार्गाने पुढे हाजीआलीपर्यंत जाऊन पार्किंगला जोडला जाईल, तिथून तो कोस्टल रोडशी जोडला जाईल, असे आयुक्त गगराणी म्हणाले. कोस्टल रोड आणि सेंट्रल पार्क भूमिगत मार्गाने जोडल्याने सेंट्रल पार्क आणि स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये येणाऱ्या गर्दीचे नियोजन करता येईल. कोस्टल रोड पार्किंगमध्ये १२०० गाड्या, १०० बसेस पार्क करण्याची क्षमता आहे.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, या प्रकल्पामुळे ३०० एकरचे ऑक्सिजन पार्क तयार होणार असल्यानं मुंबईतील हवेचं प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे. मे महिन्यापर्यंत मुंबईतील संपूर्ण रस्त्यांचे क्रॉंक्रिटीकरण पूर्ण होईल. ६ डिसेंबर २०२६ पर्यंत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पूर्ण होतील. महायुती सरकारने ज्या घोषणा केल्या त्या पूर्ण केल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

न.मुं.म.पा. सार्वत्रिक निवडणूक- २०२५ प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या प्रसिध्द

नवी मुंबई, दि. १५ : प्रतिनिधी

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५, दि ९ डिसेंबर २०२५ अन्वये २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणूकांकरिता प्रभागनिहाय अंतिम मतदार यादीचा कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला आहे.

त्यानुसार नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२५ करिता प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या १५ डिसेंबर २०२५ रोजी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय, संबंधित विभाग कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या https://www.nmmc.gov.in या संकेत स्थळावर आणि सोशल मिडीयावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

मा. राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र. रानिआ/जिपपस-२०२५/प्र.क्र.३३/का-७, दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजीच्या पत्रान्वये स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीकरिता मतदार यादीची प्रत (अंतिम मतदार यादी) (फोटोसह) प्रतिपृष्ठ रु. २/- (रुपये दोन फक्त) इतका दर आकारून उपलब्ध करून देता येईल.

तसेच मतदारांकरीता नाव शोधण्याची (Voter Search) सुविधा मा. राज्य निवडणूक आयोगाच्या https://mahasecvoterlist.in/ वेबसाईटवर Search name in voter list या टॅबमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे, याची नोंद घेण्यात यावी.

नागरिकांच्या सुविधेसाठी हेल्थ चॅटबॉट महत्वपूर्ण ठरणार - पालकमंत्री आशिष शेलार

मुंबई, दि. १५ : प्रतिनिधी

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुरवण्यात येणाऱया सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील सुविधांना आता तंत्रज्ञानाचीही जोड उपलब्ध करून देण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने डिजिटल सेवांच्या दिशेने महत्वपूर्ण पाऊल टाकले आहे. नागरिकांच्या आरोग्य सुविधेसाठी 'हेल्थ चॅटबॉट' ची सुविधा बृहन्मुंबई महानगरपालिकेने उपलब्ध करून दिली आहे. या डिजिटल सुविधांचे लोकार्पण राज्याचे माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. आशिष शेलार यांच्या शुभहस्ते आज (दिनांक १५ डिसेंबर २०२५) करण्यात आले.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने डिजीटल पुढाकार अंतर्गत नागरिकांना आरोग्य क्षेत्रासाठी चॅटबॉटची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या डिजीटल पुढाकाराच्या माध्यमातून आरोग्य क्षेत्रात पारदर्शकता वाढवतानाच, आरोग्य सुविधांची पोहच आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

सार्वजनिक आरोग्याशी संबंधित माहिती सहजशक्य आणि डिजीटल पद्धतीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांनी दिले होते. डिजीटल पद्धतीने सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे नागरिकांना अतिशय पारदर्शकपणे माहिती उपलब्ध होणार आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कामकाजात अधिकाधिक माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग केला जात आहे. याचा एक भाग म्हणून डिजीटल पद्धतीने ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यासह अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य विभाग अंतर्गत घेतलेला हा पुढाकार नागरिकांसाठी महत्त्वाचा ठरेल. अधिकाधिक तंत्रज्ञानस्नेही पुढाकारांमुळे नागरिकांच्या वेळेची बचत होईल. तसेच आरोग्य क्षेत्रातील आपत्कालीन प्रसंगीचे निर्णय घेण्यासाठी ही सुविधा महत्वाची ठरेल.

नागरिकांना आरोग्याच्यादृष्टीने प्रतिबंधात्मक काळजी घेण्यापासून ते संपूर्ण आरोग्य सेवांची माहिती देण्यासाठी 9892993368 हा चॅटबॉट क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे. या पुढाकार अंतर्गत आजाराबाबत जनजागृती, आरोग्य क्षेत्रातील मोहीमेची माहिती, नजीकची आरोग्य सुविधा, नोंदणींबाबत माहिती, आरोग्य प्रमाणपत्र तसेच परवान्याबाबतची माहिती, आरोग्य केंद्राच्या ठिकाणी भेटीची ऑनलाईन पद्धतीने नोंदणी इत्यादी सुविधा चॅटबॉटच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नागरिकांचा वेळ वाचण्यासाठी मदत होईल. त्यासोबतच आरोग्य यंत्रणेतील कार्यक्षमता वाढीसाठीही मदत होईल.

नागरी सेवांमध्ये जन्म आणि मृत्यू दाखल्यासाठी अर्ज करण्याबाबतची माहिती, विवाह नोंदणीची माहिती, अपंगत्व प्रमाणपत्र, आरोग्य परवाने तसेच प्रसूतिगृहाशी संबंधित परवाने मिळवण्याच्या प्रक्रियेची माहितीही या चॅटबॉटच्या माध्यमातून मिळणार आहे.

नागरिकांना आरोग्य केंद्राच्या ठिकाणी ऑनलाईन नोंद करण्यासाठी डिजिटल पद्धतीने नोंद करणे शक्य होणार आहे. नागरिकांची वेळेची बचत ऑनलाईन नोंदणी सुविधेमुळे शक्य होईल. राज्य आणि राष्ट्रीय स्थरावरील आरोग्य सुविधा आणि सेवांसाठी महत्वाची माहिती चॅटबॉटच्या माध्यमातून आगामी कालावधीत उपलब्ध होणार आहे. राज्य आणि केंद्र सरकारशी संबंधित विविध आरोग्य योजनांची माहिती याठिकाणी उपलब्ध होईल.

येत्या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून आरोग्य सुविधांबाबतचे समर्पक असे संकेतस्थळ आणि आयपीडी रुग्णशय्या उपलब्धतता डॅशबोर्डही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तंत्रज्ञानावर आधारित सेवांमुळे नागरिकांना आरोग्याशी संबंधित माहिती अधिक सुलभपणे मिळण्यासाठी मदत होणार आहे.

ANAND RATHI

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०० ०६३ भारत
Mobile : +91 8433508283 | Website: www.rathi.com

ई-लिलाव विक्री सूचना

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेली अनुसूचीतील स्थावर मालमत्ता, ज्यामध्ये आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड ["ARGFL"](सुरक्षित कर्जदार) यांना कर्ज खाते क्रमांक APPL00010586 आहे, त्यांच्याकडे सुरक्षित आहे. ज्याचा भौतिक ताबा ARGFL च्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, तो https://sarfaesi.auctiontiger.net या वेबसाइटद्वारे ऑनलाइन ई-लिलावाद्वारे विकला जाईल. अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या तारखेला, जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर, अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या एकूण रकमेच्या वसूलीसाठी आणि कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांकडून करारानुसार वसुली तारखेपर्यंतचे व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क खाली नमूद केल्याप्रमाणे वसूल केल्या जाईल

कर्जदाराचे नाव: (१) मे. आर्ची एम एंटरप्रायझेस (कर्जदार), सृष्टी टॉवर, दुकान क्रमांक ०२,शास्त्री नगर रोड, पारसिक बँकेजवळ, कळवा नाका, कळवा पश्चिम: ४००६०५.

सह-कर्जदाराचे नाव: (२) श्रीमती अर्चना मुकेश मोरे (सह-कर्जदार), फ्लॅट क्रमांक ए-९०२. ९वा मजला, कासा टियारा ब्लॉक सेक्टर, लोढा अप्पर ठाणे, माणकोली रोड. ठाणे: ४२१३०२. (३) श्री. मुकेश दत्तात्रय मोरे (सह-कर्जदार), फ्लॅट क्रमांक ए-९०२. ९वा मजला, कासा टियारा ब्लॉक सेक्टर, लोढा अप्पर ठाणे, माणकोली रोड. ठाणे: ४२१३०२.

मालमत्तेचा पत्ता: फ्लॅट क्रमांक ३०२, तिसरा मजला, सी विंग, फेज ३, मयूर नेचर ग्लोरी पारसिक नगर, अमित गार्डन हॉटेलजवळ, पुणे मुंबई महामार्गाजवळ, खारी गावात गट क्रमांक ४८/१, २, ५० ते ५३ आणि पारसिक कळवा पश्चिम येथे गट क्रमांक १३२, जिल्हा: ठाणे, ठाणे, महाराष्ट्र, भारत यांचे गहाणखत.

थकबाकी रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह)	रु. ५०,८१,६३२ /- (रुपये पन्नास लाख एक्याऐंशी हजार सहाशे बत्तीस फक्त)
लिलावाची तारीख	१९ जानेवारी २०२६
राखीव किंमत	रु. ८१,०६,५०० /- (रुपये एक्याऐंशी लाख सहा हजार पाचशे फक्त)
बयाणा पैसे ठेव	राखीव किंमतीच्या १०%
किमान बोली वाढ रक्कम	रु. १०,०००/- (फक्त दहा हजार रुपये)
इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ	१२ जानेवारी २०२६ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत
केवायसी कागदपत्रांसह निविदा फॉर्म सादर करण्याची तारीख आणि वेळ/ईएमडीचा पुरावा इ.	१६ जानेवारी २०२६ दुपारी ४.०० वाजेपर्यंत केवायसी कागदपत्रांसह
ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ	१९ जानेवारी २०२६ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत

टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार आनंद राठी ग्रुपच्या वेबसाइट www.rathi.com ला भेट देऊ शकतात लिलाव प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींबद्दल तपशीलवार माहितीसाठी.

हे प्रकाशन नियम ९(१) आणि ८(५) ओ सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांना ३० दिवसांची सूचना देखील आहे.

तारीख: १५ डिसेंबर २०२५
ठिकाण: मुंबई

स्वा/- आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरीकर्ता

आचारसंहिता लागू झाल्याने मंडाले ते डायमंड गार्डन मेट्रो आणि नायगाव बीडीडी चाळीतील घरांचे प्रकल्पाचे लोकार्पणाचे मुहूर्त चुकले

मुंबई, दि. १५ : प्रतिनिधी

अंधेरी पश्चिम ते मंडाले, मानखुर्द मेट्रो २ ब मार्गिकेतील मंडाले ते डायमंड गार्डन टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. या टप्प्याच्या संचलनासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास (एमएमआरडीए) सुरक्षा प्रमाणपत्रही प्राप्त झाले आहे. मात्र या टप्प्याचे लोकार्पण रखडले होते. आता आचारसंहिता लागू झाल्याने या टप्प्याचे लोकार्पण आणखी लांबणीवर जाणार आहे. दुसरीकडे म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील नायगाव बीडीडी पुनर्विकास प्रकल्पातील ८६४ घरांचे काम पूर्ण झाले असून या घरांना निवासी दाखला मिळाला आहे. मात्र या प्रकल्पातील घरांचे चावी वाटपही रखडणार असून ५०० चौ. फुटाच्या घरात वास्तव्यास जाण्याचे ८६४ रहिवाशांचे स्वप्न आता निवडणूकीनंतरच पूर्ण होणार आहे. एमएमआरडीएकडून मेट्रो २ ब चे काम सुरु आहे. या मार्गिकेचे काम तीन टप्प्यात पूर्ण करून ही मार्गिका वाहतूक सेवेत दाखल करण्यात येणार आहे. त्यातील मंडाले ते डायमंड गार्डन असा टप्पा ऑक्टोबरमध्ये वाहतूक सेवेत दाखल केला जाणार होता. मात्र या टप्प्यासाठी सुरक्षा प्रमाणपत्र प्राप्त न झाल्याने ऑक्टोबरमध्ये लोकार्पण करता आले नाही. पण आता या टप्प्यासाठी सुरक्षा प्रमाणपत्र मिळून दीड महिना उलटला तरी लोकार्पण झालेले नाही. आता पालिका निवडणूकीसाठीची आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे मंडाले ते डायमंड गार्डन मेट्रो प्रवासासाठी मुंबईकरांना थेट फेब्रुवारी २०२६ पर्यंत वाट पाहावी लागणार आहे. आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतरच लोकार्पण होणार आहे. दुसरीकडे नायगाव बीडीडी चाळीतील ८६४ रहिवाशांचे ५०० चौ. फुटाच्या घरात वास्तव्यास जाण्याचे स्वप्न पूर्ण होण्यासही अजून काही काळ लागणार आहे. म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून नायगावमधील पाच पुनर्वसित इमारतींचे काम पूर्ण झाले आहे. या इमारतीतील ८६४ घरांसाठी निवासी दाखलाही मिळाला आहे. मात्र या घरांचे चावी वाटप झालेले नाही. चावी वाटपाचा कार्यक्रम नोव्हेंबरमध्ये अचानक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रद्द केले होते. त्यानंतर चावी वाटपाचा कार्यक्रम रखडला तो रखडलाच. तर आता आचारसंहितेमुळे फेब्रुवारी २०२६ मध्ये वा त्यानंतरच चावी वाटप होणार आहे.

महाराष्ट्र शासन

अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे प्राधिकरण
पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
EMAIL ID-addcollmumbai@gmail.com PH. NO-(०२२) २२६१००१३

जाहिर नोटीस

श्रीम. सुरेखा दिलिप उगळे ------------------------अपिलार्थी
विरुध्द
सक्षम प्राधिकारी - १ झो. पु. प्रा व इतर ३ ------------उत्तरार्थी
प्रति,
एल.ए.भुलाराम,
रुम नं / शॉप नं १५, तळमजला,
मॅनियर चाळ कंपाऊंड, फातिमाबाई चाळ,
शंकर घाणेकर मार्ग, दादर (प) -----------(उत्तरार्थी क्र.४)

सदर जाहिर नोटीसी रे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडप ी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथेओम सिध्दी सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील अ.क्र. ५३ या झोपडीवर पात्र करणेकामी अपिल अर्ज दाखल केला आहे. प्रश्नांकित झोपडी / अपिलार्थी यांनी दावा केलेली झोपडी आपणाकडून खरेदी केल्याचे दिसून येत असल्याने सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०४ केले आहे. प्रकरणी दि. १८.११.२०२५ रोजीचे सुनावणीमध्ये मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसी रे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसी रे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र.०४ असून, दि. १९/१२/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली ओहतरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्यादिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृतप्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद ावी.

सही/-
सहाय्यक महसुल अधिकारी
अपर जिल्हाधिकारी कार्यालय
मुंबई शहर

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सा.बां. विभाग, मुंबई.
ई निविदा सूचना क्रमांक : ३२/२०२५-२६

कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, मुंबई हे सा. वां विभागात नोंदणीकृत / अनुभवी ठेकेदार यांचेकडून कामांच्या न लाईन ई निविदा मागवित आहे. को-या निविदा नमुना कार्यकारी अभियंता, s:// d. स्थळावर दिनांक १२.१२.२०२५ वेळ दुपारी ०१.०० ते ३०.१२.२०२५ वेळ दुपारी ०१.०० पय त न लाईन डाऊनलोड करण्याकरिता उपलब्ध होतील. तसेच शक्य असल्यास न लाईन ई निविदा कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सा.बां.विभाग, बांधकाम भवन,फ ट, मुंबई दिनांक ३१.१२.२०२५ वेळ दुपारी ०२.०० वाजता उघडतील निविदा स्वकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार नि स्वाक्षरीकारांनी राखून ठेवला आहे अट असलेली निविदा स्वकारली जाणार नाही.

टीप : निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारांनी ास व त्यावरीलडिजिटल सिगनेचर आणि वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर निविदा संदर्भात सर्व दस्ता वज न लाईन सादर करणे करिता स्वतः नाव नोंदणी करून ावी. वरील निविदा सूचनेमध्ये एकूण ५६ कामे समावि असून सविस्तर निविदा सूचना कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सा.वां.विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावर निविदा सूचना पहावयास मिळेल कार्यकारी अभियंता यांना विनंती केल्यास नोटीसची प्रत विनामुल्य मिळू शकेल.

(उपरोक्त काम हे ३ ते १० लाखामधील आहे.)

जा.क्र. काअ/दमुंविवि/निविदा/७४४४/२०२५-२६
दि. ०५.१२.२०२५

-sd-
कार्यकारी अभियंता,
दक्षिण मुंबई विद्युत विभाग,
सा.बां. विभाग, मुंबई.

डी.जी.आय.पी.आर.आरओसी २०२५-२६/क्र-५/C४५९९